जा.क्र.2020/पुरवठा/प्रशा-1/कावी-
जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा) जालना
दिनांक :- 15.06.2020.

प्रति,

तहसिलदार जालना/ बदनापूर/ भोकरदन/ जाफ्राबाद/ परतूर/ मंठा/ अंबड/ घनसावंगी जि.जालना.

**विषय :- माहे जुलै-2020, चे एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकरी अन्न धान्याचा पुरवठा करणे बाबत.**

उपरोक्त विषयी **माहे जुलै,2020** साठी खालीलप्रमाणे तालुकानिहाय गोदामातील शिल्लक साठयानूसार व मागणीनुसार एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यासाठी खालीलप्रमाणे नियतन देण्यात येत आहे. शासनाकडून **माहे जुलै, 2020** करिता प्राधान्य कुटूंब योजनेप्रमाणे प्रति लाभार्थी 3 किलो गहू व 2 किलो तांदूळ या प्रमाणात नियतन प्राप्त झालेले आहे. शासनाकडून प्राप्त नियतनानूसार तालूकानिहाय लाभार्थी प्रमाणानूसार खालीलप्रमाणे नियतन देण्यात येत आहे.

| अ. क्र | तालुक्याचे / शासकीय गोदामाचे नांव | लाभार्थी संख्या | क्वांटम (किलो) प्रति लाभार्थी | देय नियतन ( क्विंटल मध्ये ) |
|---|---|---|---|---|
| | | | गहु | **गहु डि.ओ.क्र.8521 दि. 12.06.2020** |
| 1 | जालना (ग्रामीण) | 35411 | 03 | 913 |
| 2 | जालना टी.एफ (बदनापूरसाठी) | 12851 | 03 | 200 |
| 3 | भोकरदन | 29285 | 03 | 878 |
| 4 | जाफ्राबाद | 20214 | 03 | 235 |
| 5 | परतुर | 22794 | 03 | 600 |
| 6 | मंठा | 19024 | 03 | 500 |
| 7 | अंबड | 25985 | 03 | 779 |
| 8 | घनसावंगी/ अंबड टीएफ, (घनसावंगीसाठी) | 8114 | 03 | 243 |
| | | **173678** | | **4348** |

शासनाने ठरवून दिलेल्या देय नियतनाप्रमाणेच उपलब्धतेनुसार अन्नधान्य वितरीत करावे. सदर धान्य लक्ष निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कार्यपध्दतीप्रमाणे वितरीत करण्याची दक्षता घेण्यात यावी. कार्डधारकास स्वस्तधान्य दुकानाच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप होत असल्याची खातरजमा करण्यात यावी. सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, 2001 मधील तरतुदीनुसार उपयोगीता प्रमाणपत्र नियमीत सादर करण्यात यावे.

**मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने**

**जिल्हा पुरवठा अधिकारी जालना**

**प्रतिलीपी**

1.मा. उप आयुक्त (पुरवठा) औरंगाबाद यांना माहीतीस्तव सविनय सादर.
2.मा.श्री.रावसाहेब दानवे (पाटील) खासदार जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
3.मा.श्री.बबनराव लोणीकर आमदार ९९-परतूर विधानसभा जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
4.मा.श्री.राजेश टोपे आमदार १००-घनसावंगी विधानसभा जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
5.मा.श्री.कैलास गोरंट्याल आमदार १०१-जालना विधानसभा जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
6.मा.श्री.नारायण कुचे आमदार १०२-बदनापूर विधानसभा जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
7.मा.श्री.संतोष दानवे आमदार १०३-भोकरदन विधानसभा जि.जालना यांना माहितीस्तव सादर.
8.श्री.पी.के.पिंपळे, अ.का./ श्री.डी.आर.ठोंगे अ.का. धान्य वाहतूक प्रतिनिधी यांना देवून कळविण्यात येते की, त्यांनी अन्न महामंडळाच्या गोदामातून गहु व तांदुळ स्विकारतांना शासनाच्या निर्देशानुसार संयुक्तपणे नमुने घेऊन धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची **दिनांक 30.06.2020** पुर्वी उचल करावी. या जिल्हयाचे वाहतुक गुत्तेदाराने लेखी स्वरुपात प्राधिकृत केलेल्या ट्रकमधूनच वाहतूक करावी व उक्त नमूद केलेल्या गोदामात पाठवावे.
9.गोदामपाल जालना (ए.आर)/जालना(टी.एफ)बदनापूरसाठी/भोकरदन/जाफ्राबाद/परतुर/मंठा/अंबड/घनसावंगी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
10.मे.परफेक्ट रोडलाईन्स जालना अन्नधान्य नियतन वाहतुक कंत्राटदार,जिल्हा जालना यांना देवुन कळविण्यात येते की, आपण उक्त नमुद केलेले अन्नधान्य शासकीय गोदामास **दिनांक 30.06.2020** पुर्वी आपणाकडील मा.जिल्हाधिकारी जालना यांची मान्यता दिलेल्या ट्रक मधुनच वाहतुक करावे धान्य व्यपगत झाल्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गतच्या धान्याची वाहतुक करतांना वाहनभार क्षमतेपेक्षा जास्त वाहतुक होणार नाही याची दक्षता घ्यावी.तसेच वरील प्रमाणे देण्यात आलेल्या नियतनामध्ये कमी/ अधीक धान्य पाठवु नये. याची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी.
11. उप व्यवस्थापक अन्न महामंडळ जालना भोकरदन रोड/बोरखेडी जि.जालना यांना डी.ओ.चे दोन प्रती देवून कळविण्यात येते की श्री.पी.के.पिंपळे अ.का./ श्री.डी.आर.ठोंगे अ.का. धान्य वाहतूक प्रतिनिधी यांना धान्य उचलीचे कामासाठी आदेशीत करण्यात येत आहे. तरी आमचे प्रतिनिधीस धान्याची डिलेव्हरी दयावी. डिलेव्हरी देतांना अर्धवट व फाटकी पोती देऊ नयेत तसेच डी.ओ. निरंक होताच त्याची एक प्रत या कार्यालयास देण्यात यावी.
12.जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी जालना याना देवुन सुचित करण्यात येते की जालनाच्या बेबसाईटवर सदर आदेश प्रदर्शित करण्यात यावा.
13.जिल्हा माहीती अधिकारी जालना यांना प्रसिध्दीसाठी देण्यात येते.
14.नायब तहसिलदार पुरवठा ,पुरवठा निरीक्षक-1 व 2 यांना देवुन सुचित करण्यात येते की नियतन उचल वाटपावर नियंत्रण ठेवण्यात यावे.

**जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना**